# राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना

राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना ही राज्य शासनाच्या आदीवासी विभाग व सामाजिक न्याय विभागा मार्फत दिनांक २० ऑगष्ट २००३ पासून राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा राबविण्यांत येते. या योजनेचा लाभ सर्व मान्यता प्राप्त शाळा / कॉलेज मधिल विद्यार्थ्यांना दिला जातो. या योजनेमध्ये मृत्यु दावा, कायमच्या अपंगत्वाचा दावा, परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती, अपघातामध्ये सायकल हरविल्याचा दावा केल्यास नियमानुसार विमा कंपणी कडून नुकसान भरपाई देण्यांत येते.

## या योजनेमध्ये खालील प्रमाणे भरपाई देण्यांत येते.

| अ.क्र. | अपघाताचे स्वरुप | भरपाईची रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्यास पालकांना | रुपये ३०,०००/- |
| २ | विद्यार्थ्यांना कायमचे अपंगत्व आल्यास | रुपये ५०,०००/- |
| ३ | अपघातामुळे विद्यार्थ्यांची पुस्तके हरविल्यास | रुपये ३५०/- पर्यन्त |
| ४ | विद्यार्थी परिक्षेला बसू न शकल्यास परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून | रुपये ६५०/- पर्यन्त |
| ५ | अपघातामध्ये सायकल चोरी गेल्यास किंवा नुकसान झाल्यास | रुपये १५००/- पर्यन्त |
| ६ | चष्मा हरविल्यास | रुपये ७५०/- पर्यन्त |

वरील प्रमाणे नूकसान भरपाई देण्याची तरतुद असून, हि योजना शिक्षण विभाग ( प्राथमिक ) जिल्हा परिषद गोंदिया या कार्यालयाकडून राबविण्यांत येते.

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )
जिल्हा परिषद गोंदिया

# शालेय पोषण आहार योजना

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे दृष्टीने तसेच प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना पट नोंदणीचे, उपस्थितीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने देशात सर्वत्र शालेय पोषण आहार योजना टप्या-टप्याने सन १९९५-९६ पासून सूरु केली आहे.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग यांचे कडील शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर १९९५ अन्वये सन १९९५-९६ मध्ये राज्यात ही योजना सूरु होवून वर्ष १९९६-९७ मध्ये २७ जिल्हयातील २०० गटातील ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना ती लागू करण्यांत आली आहे. सन १९९७-९८ मध्ये मागील वर्षापेक्षा जादा दोन जिल्हे व १०० टक्के गटात सदर योजना सूरु करुन ग्रामिण भागासह शहरी भागातील विद्यार्थ्यांना याचा लाभ देण्यांत येत आहे. यात खाजगी, शासनमान्य १०० टक्के अनुदानातील शाळेतील विद्यार्थी अंर्तभूत आहेत. अशा प्रकारे वर्ष १९९७-९८ मध्ये एकूण २९ जिल्हयातील (मुंबई सोडून ) ३०० गटात सदर योजना कार्यान्वित झाली. सन १९९८-९९ मध्ये नव्याने निर्माण केलेल्या नऊ गटांचा समावेश झाला असून एकूण ३०९ गटात योजना चालु झाली. यामध्ये अंशता अनुदानित खाजगी शाळांचा सुध्दा समावेश करण्यांत आलेला आहे. सदर्हु योजनेत सन १९९९-२००० मध्ये डिसेंबर १९९९ पासून मुंबईचा समावेश करण्यांत आला आहे. सन २००२-२००३ मध्ये वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजने अंतर्गत शैक्षणिक केंद्र, अनुदानित अपंग व मुकबधीर शाळा यांचा समावेश करण्यांत आला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात टप्या-टप्याने जुन २००२ पासून शिजविलेले अन्न देण्यात येते.

या योजने अंतर्गत प्राथमिक शाळेतील इय्यता १ ली ते ५ वी तील किमान ८० टक्के उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा ३ किलो धान्य ( तांदुळ ) देण्यांत येत असे. आता मात्र तांदळाच्या ऐवजी प्रती विद्यार्थी १०० ग्रॅम तांदुळ, ( ३४० कॅलरी ) , प्रथीने ८ ग्रॅम, दाळ २० ग्रॅम, ( ७० कॅलरी ), पालेभाज्या ५० ग्रॅम, ( २५ कॅलरी ), तेल किंवा स्निग्ध पदार्थ ५ ग्रॅम, ( ४५ कॅलरी ) प्रमाणे अन्न शिजवून देण्यांत येते.

शासन निर्णय क्रमांक/४४२६ दिनांक -२१/०८/२००८ अन्वये इय्यता ६वी ते ८ वी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू करण्यांत आली आहे.

सदर योजना ही केंद्र शासनाचा २ रुपये प्रति विद्यार्थी प्रति दिवसाप्रमाणे हिस्सा व राज्यशासनाचा ०.५० पैसे प्रमाणे प्रति दिवस प्रति विद्यार्थी अशा प्रकारे अनुदान प्राप्त होत असून सदर अनुदान शासनाकडून टप्या-टप्याने प्राप्त होत असतो. शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद गोंदिया या कार्यालयाकडून प्राप्त अनुदान विद्यार्थी संख्येच्या आधारावर शाळांचे मागणीनुसार पंचायत समिती स्तरावर अनुदान वितरीत करण्यांत येते. पंचायत समिती स्तरावरुन सदर अनुदान शाळांना वितरीत करण्यांत येते.

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )
जिल्हा परिषद गोंदिया

# प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींना उपस्थिती भत्ता

प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी इय्यता १ ली ते ४ थी मधिल शाळेत जाणाऱ्या आदीवासी उपयोजना क्षेत्रातील सर्व मुली तसेच आदीवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जमातीच्या मुलींना तसेच अनुसूचित जाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातीत दारिद्रय रेषेखालील विद्यार्थिनिना प्रतिदीन प्रत्येक मुलीमागे एक रुपया या दराने सदर मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता दिनांक ३ जानेवारी १९९२ या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदीनी सुरु करण्यास शासनाने शिक्षण व सेवायोजन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १० जानेवारी १९९२ अन्वये अनुमती दिलेली आहे. त्यानुसार शिक्षण विभाग ( प्राथमिक ) जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत ही योजना राबविण्यांत येते.

सदर योजनेचे अनुदान शासनाकडून प्राप्त होत असून जिल्हा स्तरावरुन सदर अनुदान प्रत्येक पंचायत समितींना पाठविण्यांत येतो. पंचायत समिती स्तरावरुन विद्यार्थी संख्येनुसार शाळांना अनुदान वाटप करण्यांत येतो.

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )
जिल्हा परिषद गोंदिया

**प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती/जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा**
**( मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा )**

सदर योजना सन १९७९ पासून सुरु करण्यांत आली आहे. प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती, जमाती, भटक्या व विमुक्त जातीच्या मुलांची विशेषता त्यांच्या पैकी मुलींची पटसंख्या व उपस्थिती फारच कमी व असमाधान करक असते. या जमातीचे गळतीचे प्रमाण तुलनात्मक रीत्या फार जास्त असल्याने परिणामता माध्यमिक शिक्षण स्तरावर त्यांची गळती वाढते, म्हणून प्राथमिक शाळांतील या अनुसूचित जाती/जमातीच्या मुलांची पटसंख्या वाढविण्यासाठी उपाययोजना आवश्यक आहे. तसेच कमीत कमी प्राथमिक शिक्षण चालू ठेवून पुर्ण करण्यासाठी या मुलांना सहाय्य करणे जरुरीचे आहे.

प्राथमिक शाळांत इय्यता १ ली ते ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती, जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या दारिद्रय रेषेखालील मुलांना गणवेषांचे संच आणि लेखन साहित्य मोफत पुरविण्यांत येते. सदर योजना बाबत यापुर्वि शिक्षण विभाग ( प्राथमिक ) या कार्यालयाकडून गणवेश व लेखन साहित्य खरेदी करुन पुरविण्यांत येत होते. परंन्तु कालांतराने सन २००४ पासून या विभागाकडून अनुदान पंचायत समितींना वितरीत करण्यांत येतो व पंचायत समिती मार्फत सदर अनुदान शाळांना वितरीत करण्यांत येतो. प्रत्येक शाळेतील शाळा समिती या बाबत योग्य ती कार्यवाही करुन प्रति वर्षी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातुन प्रत्येक लाभार्थ्यास गणवेशाचा एक संच व लेखन साहित्य देण्यांत येते. यामध्ये ८० टक्के रक्कम गणवेशा करीता व २० टक्के रक्कम लेखन साहित्या करीता अशी विभागणी करुन वाटप करण्यात येते.

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )
जिल्हा परिषद गोंदिया